प्रेस नोट

## हडपसर पोलीसांकडुन वाहन चोरी व प्रवासादरम्यान मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करुन ०४ मोटर सायकली, ०२ सायकली व १४ मोबाईल हस्तगत

पुणे शहरातील दुचाकी वाहन चोरीस व मोबाईल चोरीच्या गुन्हयास प्रतिबंध करुन, चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. शशिकांत शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त सो उत्तर प्रादेशिक विभाग पुणे व मा. दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त सो, परि-४ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत मा. समिर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, वानवडी विभाग पुणे, मा. विष्णु पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हडपसर पोलीस ठाणे पुणे, मा. अंजुम बागवान पोलीस निरीक्षक (गुन्हे), मा. विश्वजित खुळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे सुचनानुसार हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत विशेष मोहिम राबविण्यात येत होती.

फिर्यादी अर्चना राजकुमार बडगे वय ३२ वर्षे रा. गुरुदत्त कॉलनी भेकराईनगर फुरसुंगी ता. हवेली जि. पुणे या हडपसर गाडीतळ पी एम टी बस स्टॉप येथुन कोंढवा पीएमटी बसमध्ये गर्दीतुन चढत असताना त्यांचे पर्समधील सॅमसंग कंपनीचा मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेले बाबत फिर्याद दाखल करण्यात आली होती.

हडपसर पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी हे वाहन चोरीच्या व मोबाईल चोरीच्या गुन्हयांचा तपास करीत असताना तांत्रिक विश्लेषण व पो. ना. २८०० गायकवाड यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी नामे अभिजित महादेव कांबळे वय १८ वर्षे यास ताब्यात घेवुन सखोल तपास केला असता त्याने पुणे शहर व पुणे ग्रामीण परिसरातुन वाहन चोरी व मोबाईल चोरी केल्याचे निष्पन्न झाले असुन त्याचेकडून एकुण ०४ मोटर सायकली व १४ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल हस्तगत करुन हडपसर पोलीस स्टेशन, समर्थ पोलीस स्टेशन व यवत पोलीसकडील वाहन चोरीचे व मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलीसांना यश आले आहे.

तसेच तपास पथकातील हडपसर पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी हे गुन्हयाचा तपास करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी नामे विकास तिलबहादुर थापा वय ३० वर्षे यास ताब्यात घेवुन सखोल तपास केला असता त्याने हडपसर परिसरातुन सायकली चोरी केल्याचे निष्पन्न झाले असुन त्याचेकडुन एकुण ०२ सायकली हस्तगत करण्यात आले आहे.

तपास पथकातील सहा. पोलीस निरीक्षक, संदिप नारायण देशमाने, सहा. पोलीस निरीक्षक हेमंत चंद्रकांत पाटील, पोलीस उप निरीक्षक सोमनाथ शेंडगे , पोलीस हवालदार युसुफ पठाण, पोलीस हवालदार राजेश नवले, पोलीस नाईक सैदोबा भोजराव, राजु वेंगरे, प्रमोद टिळेकर, प्रताप गायकवाड, विनोद शिवले, गणेश दळवी पो. शि. अमित कांबळे, अकबर शेख, दाऊद सय्यद यांनी वरील कामगीरी केली.